# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
## पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

## प्रेस नोट

**दिनांक ०३/०८/२०२२ (बुधवार)**

**(दुपार)**

---

### जबरी संभोग

**१) पो.स्टे. सावनेर :–** दिनांक ०२/०/२०२२ चे १७:०० वा. ते १७.३० वा. चे सुमारास आरोपी नामे– कृष्णा अरुन मानकर, वय २५ वर्ष, रा. आदासा ता कळमेश्वर जि. नागपुर याने वय १३ वर्षीय अल्पवयीन पीडित/फिर्यादी मुलगी हि एकटी घरात असतांना त्याने घरात येवुन दाराला कडी लावुन तिचे तोंड दाबुन बळजबरीने जबरी संभोग केला. ती ओरडु लागली तर तिला आरोपीने हाताने व काडीने मारले.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरुन पो.स्टे. सावनेर येथे आरोपीविरुध्द कलम ३७६, ३७६(२)(जे), ३७६(२)(फ),३७६(३),३२३ भादंवि. सहकलम ४ बाल लैगींक अत्याचार प्रतिबंधक कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीला अटक करण्यात आली असून गुन्हयाचा पुढील तपास मसपोनी रासकर मो.क्र. ९०८२१९६०८० या करीत आहे.

**२) पो.स्टे. काटोल :–** दिनांक ०५/०६/२०२२ चे १४:०० वा. चे सुमारास विधीसंघर्षित बालक वय १६ वर्ष याने वय १६ वर्षीय अल्पवयीन पीडित/फिर्यादी मुलीचे घरी येवून तिचेवर लैंगिक अत्याचार करून तिला गर्भवती केलेले आहे.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरुन पो.स्टे. काटोल येथे आरोपीविरुध्द कलम ३७६, ४५२ भादंवि. सहकलम सहकलम ४, ६ बाल लैगींक अत्याचार प्रतिबंधक कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. सदर गुन्हयाचा पुढील तपास मपोउपनि पुनम कोरडे पोलीस स्टेशन काटोल मो ंन ७२७६३३०४५५ या करीत आहे.

### विनयभंग

**पो.स्टे. सावनेर:–** दिनांक २६/०७/२०२२ चे १२.३० वा. ते २९/०७/२०२२ चे १२.३० वा. दरम्यान अल्पवयीन फिर्यादी/पीडित वय १७ वर्ष हि शाळेतुन घरी परत जात असतांना आरोपी नामे– पराग महल्ले रा. ईसापुर ता. सावनेर याने पीडितेचा वारंवार पाठलाग करून तिला ‘तु मला खुप आवडते तु तुझा मोबाईल नंबर दे, तु मोबाईल नंबर नाही दिला तर मी तुझा जिव घेणार’ अशी धमकी देवुन पिडीतेचा विनयभंग केला.

सदर प्रकरणी फिर्यादी यांचे रिपोर्टवरुन पो.स्टे. सावनेर येथे आरोपीविरुध्द कलम ३५४(ड),५०६ भादवी, सहकलम १२ बाल लैगींक अत्याचार प्रतिबंधक कायद्यान्वये गुन्हा नोंद करण्यात आलेला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरू आहे. गुन्हयाचा पुढील तपास मपोसनी रासकर मो क्र ९०८२१९६०८०हे करीत आहे.

**पोलीस माहिती कक्ष**
**नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर**